N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई **P.S.(ठाणे):** रबाळे **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0125 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/04/2021 05:58 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 08/04/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/04/2021
**Time From (वेळेपासून):** 20:31 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 05:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/04/2021 **Time (वेळ):** 05:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/04/2021 05:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 3 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** लाईफ लाईन हास्पीटल, ऐरोली येथील समोरिल रोडवर ;नवी मुंबई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. शिवम रोहित भल्ला

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 2001/टावर नं 5,वसंत लान्स, माजिवडा,ठाणे,रबाळे ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 2001/टावर नं 5,वसंत लान्स, माजिवडा,ठाणे,रबाळे ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9930151532

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक डॉ राजु केरबा मुरूडकर | | | 1. रो हाऊस नं 26, साईसदन सोसायटी, सेक्टर -2, ई ऐरोली, नवी मुंबई,रबाळे , नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000 च्या 250 नोटा भारतीय चलनाच्या | 500,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 500,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक- 09/04/2021 मी श्री. शिवम रोहित भल्ला वय 26 वर्षे राहणार- 2001/टावर नं 5, वसंत लान्स, माजिवडा, ठाणे मोबाईल नंबर 9930151532मी, वरील प्रमाणे असून वरील ठिकाणी सुमारे 4 महिन्यापासून कुटूंबासह वास्तव्यास आहे. मी मागील 01 वर्षापासुन इमिनोशाप इंडीया प्रा.लि. नवी मुंबई या कंपनीकरिता ठाणे महानगरपालिका मध्ये संपर्क अधिकारी म्हणुन काम करीत आहे. नमुद कंपनी ही वेगवेगळ्या हास्पीटल, शासकीय खाजगी रूग्णालयात तसेच मेडीकल शापमध्ये वैदयकीय उपकरणे पुरविण्याचे काम करते. तसेच नमुद कंपनी शासनास वैदकीय उपकरणांची आवश्यकता असल्यास शासनाचे निविदेप्रमाणे उपकरणे पुरविण्याचे काम करते. त्याप्रमाणे मी आमच्या वरील कंपनीने ठाणे महानगर पालिका येथे वैदकीय उपकरणे पुरविण्याकरिता निविदा भरल्यास मी नमुद कंपनीतर्फे संपर्क अधिकारी म्हणुन ठाणे महानगर पालिकेतील निविदे संदर्भातील सर्व कामकाज पाहतो. ठाणे महानगर पालिकेच्या हद्दीत वैदयकीय उपकरणांची आवश्यकता असल्याने ठाणे महानगर पालिकेने वैदयकीय उपकरणे पुरविण्याकरिता दि. 15/07/2020 रोजी निविदा काढली होती. त्याप्रमाणे आमचे कंपनीने दि. 27/07/2020 रोजी व्हेंटीलेटर पुरविण्याबाबत निविदा भरलेली होती. सदर निविदा आयडी 2020 TMC594884_1 असा आहे. सदर निविदा भरण्याकरिता प्रोसेसिंग फी 20,000/- व इ.एम.डी. 6,00,000/- असे एकुण 6,20,000/- निविदा भरण्याकरिता मी भरणा केले होते. नमुद निविदा करिता आमची कंपनी तांत्रिक व आर्थिक पात्रता पुर्तता करीत असल्याने ठाणे महानगर पालिकेने दि. 07/08/2020 रोजी नमुद निविदा स्विकृत केलेली आहे. मी आमचे इमिनोशाप इंडीया प्रा.लि. या कंपनीकरिता ठाणे महानगरपालिका येथील संपर्क अधिकारी असल्याने निविदेच्या अनुषंगाने ठाणे महानगर कार्यालयात जावुन तेथील आरोग्य वैदयकीय अधिकारी डा.मुरुडकर यांना भेटलो असता, त्यांनी त्यावेळी उपकरणांची आवश्यकता नसल्याचे तसेच आवश्यकता वाटल्यास उपकरणे मागविण्यात येईल असे मला सांगण्यात आले होते.दि. 06/04/2021 रोजी मला माझे मोबाईलवर ठाणे महानगर पालिकेमधील आरोग्य वैदयकीय अधिकारी डा राजु मुरूडकर यांनी त्यांचे मोबाईल वरुन संपर्क करून ठाणे महानगरपालिके मध्ये येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी त्यांना ठाणे महानगर पालिका येथील त्यांचे कार्यालयात भेटण्यास गेलो असता, श्री. मुरूडकर यांनी मला ठाणे महानगर पालिकेस वैदयकीय उपकरणांची आवश्यकता असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी आमचे कंपनीने भरलेल्या निविदे संदर्भात माहिती देऊन सध्या ठाणे महानगर पालिकेला 30 व्हेंटिलेटरची आवश्यकता असल्याचे सांगितले व नमुद 30 व्हेंटिलेटर निविदा आमचे कंपनीस देतो असे सांगुन त्याकरिता निविदेच्या एकुण रक्कमेच्या 10 टक्के रक्कम दयावी लागेल असे सांगितले. त्यावेळी मी श्री. मुरूडकर यांना आमचे कंपनीच्या पदाधिकारी यांचे सोबत चर्चा करून सांगतो असे सांगुन निघुन आलो आहे. नमुद आरोग्य वैदयकीय अधिकारी श्री. मुरुडकर यांनी मी संपर्क अधिकारी असलेल्या

इमिनोशाप इंडीया प्रा.लि. नवी मुंबई कंपनीस ठाणे महानगरपालिकेत 30 व्हेंटिलेटर पुरविण्याकरिता निविदा मंजुर करून देतो असे सांगुन नमुद निविदेच्या एकुण रकमेच्या 10 टक्के लाचेच्या रकमेची मागणी केलेली असुन मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई होण्याकरिता दि. 06/04/2021 रोजी माझे हस्ताक्षरात लेखी तक्रार दिली आहे.सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. 06/04/2021 रोजी दोन शासकीय पंच साक्षीदारांसह पडताळणी कारवाई केली. नमुद पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक श्री. मुरूडकर यांनी माझेकडे आमचे कंपनीस 30 व्हेंटीलेटर पुरविण्याची निविदा देण्याकरिता प्रत्येकी किंमत 4 लाख 95 हजार प्रमाणे एकुण रकमेच्या 10 टक्के म्हणजेच प्रमाणे 15 लाखाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. डा. मुरूडकर यांनी लाचेची मागणी केली परंतु लाचेची रक्कम कधी व कोठे दयायची हे सांगितले नसल्याने पोनि. देशमुख यांनी पुन्हा दि. 07/04/2021 रोजी पुन्हा पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.दि. 07/04/2021 रोजी श्री. मुरूडकर हे महासभेत व्यस्त असल्याने त्यांनी मला तक्रारदार यांना ऐरोली येथील त्यांचे लाईफ लाईन हास्पीटल येथे भेटण्यास बोलाविले. त्यावेळी डा मुरूडकर यांना मी त्यांना 15 लाख रूपये एकरकमी देणे शक्य होत नसल्याचे सांगुन मी त्यांना टप्या टप्याने 3 हप्त्यात 15 लाख रुपये करुन देतो असे सांगितले. त्यावेळी डा. मुरूडकर यांनी त्यास होकार दर्शवून दि.8.4.2021 रोजी लाईफ लाईन हास्पीटल एरोली से.3 येथे लाचेची रक्कम 500000 रु. घेवून येण्यास सांगितले. दि.8.4.2021 रोजी लोकसेवक डा.मुरुडकर यांनी त्यांचे लाईफ लाईन हास्पीटल एरोली येथे लाचेची रक्कम.घेवून बोलाविले असल्याने सर्व कायदेषिर बाबींची पुर्तता करुन सापळा पथकासह ऐरोली येथे डा मुरूडकर यांचे लाईफ टाईम हास्पिटल जवळ आलो. तेथे हास्पिटलच्या बाहेर आल्यानंतर डा मुरूडकर यांनी मला त्यांचे खाजगी वाहन फोर्ड एनडीव्हर कार मध्ये बसण्यास सांगितले त्याप्रमाणे मी त्यांचे गाडीत बसलो व डा. मुरूडकर यांना ये लिजीए....... ये पाच लाख ..... ये दो...... ये....चार और ये पचास हजार असे बोलुन लाचेची रक्कम माझे उजव्या हाताने उजव्या पन्टच्या खिशातुन काढुन लोकसेवक डा. मुरूडकर यांच्या समोर धरली असता ती त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून गाडी मधील ए.सी.चे बटनाचे खालील कप्पात ठेवली. त्यानंतर डा मुरूडकर यांनी ल ाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी पुर्वनियोजित इशारा केला असता जवळंच असलेल्या सापळा पथकातील पो.नि. देषमुख व पो.हवा.परदेषी, पोषि/कडव व पोना/सोनावणे यांनी डा मुरूडकर यांना फोर्ड एनडीव्हर कार मध्ये पकडले. त्यानंतर डा. मुरूडकर यांना पो.नि. देषमुख व पो.हवा. परदेशी, पोशि/कडव यांनी स्वतःची ओळख करुन देवुन त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. देशमुख यांनी दोन्ही पंचासमक्ष श्री. मुरूडकर यांना त्यांचे नाव, पत्याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव डा. राजु केरबा मुरूडकर, वय 55 वर्षे, आरोग्य वैदयकीय अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे , राहणार- रो हाऊस नं 26, साईसदन सोसायटी, सेक्टर -2, ई ऐरोली, नवी मुंबई असे सांगितले. त्यानंतर डा. राजु मुरूडकर यांना लाचेच्या रक्कम कुठे ठेवली याबाबत पंचासमक्ष विचारले असता, त्यांनी नमुद लाचेची रक्कम ही त्यांचे गाडीचे एसीच्या बटनाच्या खालील कप्यात ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष सदरची रक्कम एसीच्या बटनाच्या खालील कप्यातून काढुन ती लाचेची रक्कम पंचांनी ताब्यात घेतली. त्यानंतर घटनास्थळाजवळील रेल्वे पार्कींग शेड मध्ये जावून अंधारात लोकसेवक डा राजु मुरूडकर यांचे दोन्ही हाताची अल्ट्राव्हायलेट प्रकाषात तपासणी केली असता त्यांचे दोन्ही हाताचे तळव्यास व सर्व बोटांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म आढळुन आले. डा. मुरूडकर यांचे एनडीव्हर गाडीतुन ताब्यात घेतलेले लाचेचे 5,00,000/- रूपये (2000/- रू दराच्या 250 नोटा ) हस्तगत नोटांचे नंबर पडताळले असता ते सापळापुर्व कारवाई दरम्यान नोंद केलेल्या नंबर्सप्रमाणे जुळुन आले. वरील कारवाईबाबत दि.06/04/2021 व दि. 07/04/2021 रोजी पडताळणी व 08/04/2021 रोजीची सापळापुर्व- सापळा पंचनामा करण्यात आला आहे.एकंदरीत करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाईमध्ये आरोपी लोकसेवक डा. राजु केरबा मुरूडकर, वय 55 वर्षे, आरोग्य वैदयकीय अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे , राहणार- रो हाऊस नं 26, साईसदन सोसायटी, सेक्टर -2, ई ऐरोली, नवी मुंबई यांनी निविदेच्या एकुण रक्कमेच्या 10 टक्के असे एकूण 15 लाख रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून लाचेचा पहिला हप्ता म्हणून पाच लाख रूपये रक्कमेची मागणी करून न्यु लाईफ लाईन हास्पीटल, ऐरोली, सेक्टर 2 समोरील रोडवर त्यांचे एनडीव्हर कार नं एम.एच 43 ए.आर 8600 या गाडी मध्ये स्विकारताना सापळा पथकाने त्यांना दि. 08/04/2021 रोजी 20.31 वा. रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी त्यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.माझी फिर्याद मराठीत लपटापवर टंकलिखीत करुन ती मला समजावुन सांगितली. ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे. समक्ष (योगेश देशमुख) (शिवम रोहित भल्ला ) पोलीस निरीक्षकअन्टी करप्शन ब्युरो, ठाणेअन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** YOGESH ASHOKRAO GAWADE(I (Inspector)) / POBN59290 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name(नाव):** YOGESH ASHOKRAO GAWADE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN59290

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**